कौटुंबिक न्यायालय, बीड,हे जिल्हा न्यायालय, बीड येथील जुन्या न्यायालयीन इमारतीमध्ये कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक दुरुस्तीच्या कामाच्या रु.२५,७५,०००/- इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक : कौटुंन्या १११९/१९३/प्र.क्र.३५/का.०९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १९ जून, २०१९

वाचा :

१) विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.कौटुंन्या १११६/३७६/प्र.क्र.८६/का.९, दि.१३.१०.२०१६

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. B(W) ४९७/६४४९ of २०१०, दि.१६.०२.२०१९.

३) प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे पत्र क्र. बांवि /३६९२/२०१९ दि. ०४.०५.२०१९

प्रस्तावना :

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये १४ व्या वित्त आयोगांतर्गत बीड येथे कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. सदर न्यायालय जिल्हा न्यायालय, बीड येथील जुन्या न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील पश्चिमेकडील बाजूस कार्यान्वित करण्यासाठी इमारतीमध्ये दुरुस्तीची कामे करावयाची आहेत. त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने संदर्भ क्र. २ प्रमाणे शासनास प्रस्ताव अंदाजपत्रकासह सादर केलेला आहे. सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रकीय रक्कम परीगणित करुन प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिलेली आहे. त्यानुसार कौटुंबिक न्यायालय, बीड हे जिल्हा न्यायालय, बीड येथील जुन्या न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील पश्चिमेकडील बाजूस कार्यान्वित करण्यासाठी इमारतीमध्ये दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१४ व्या वित्त आयोगांतर्गत स्थापन कौटुंबिक न्यायालय, बीड हे जिल्हा न्यायालय, बीड येथील जुन्या न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील पश्चिमेकडील बाजूस कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक दुरुस्तीच्या रु.२५,७५,०००/- इतक्या रकमेच्या कामास (Rs.२०,००,०००/- for civil and furniture work and Rs.५,७५,०००/- for electric work) या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी वित्तीय अधिकाराच्या अटींचे पालन करण्याची व प्रचलित कार्यपद्धतीचा अवलंब करुन व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी.

३. सदर प्रकरणी दुरुस्तीचा खर्च मागणी क्र. जे-१, (००) २०१४, न्यायदान, १०२-उच्च न्यायालये (१३) १४ व्या वित्त आयोगांतर्गत योजना (१३)(०२) कौटुंबिक न्यायालये (अनिवार्य) (२०१४ ०६०१) २७-लहान बांधकामे या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.११९६ सा. बां., दिनांक १५.०३.२०१९ व त्या विभागाच्या सहमतीने तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक १७.०४.२०१५ (वित्तीय अधिकार नियम पुस्तीका-१९७८) मधील भाग-पहीला, उपविभाग ३, अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७(२)(अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१९१६१०३७५४१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.06.19 16:08:22 +05'30'

(अ. श्या. कलोती)

विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति,

१. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२. प्रबंधक (निरीक्षणे-१ व २), मा.उच्च न्यायालय, मुंबई
३. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, बीड
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता १/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
५. जिल्हा कोषागार अधिकारी, बीड.
६. उप जिल्हा कोषागार अधिकारी, बीड.
७. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
८. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
९. विधी व न्याय विभाग (का.२३/२४/२५), मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती (का-९).